# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक विभाग, ठाणे शहर

महाराष्ट्र पोलीस

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION / 80 /2018
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा,यांचे कार्यालय,
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :- 16112018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

विषयः– जुना रेल्वे पत्री पुलाचे निष्काशनाचे कामाचे वेळी वाहतुकीत केलेल्या बदला बाबत.

संदर्भ :– १) PNVL/Rates/KYN/Pathripul ROB Date:- 15/11/2018
२) पोनि वाहतुक शाखा/डोंबिवली/८०२/२०१८ दि.१६/११/२०१८

—:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:—

ज्याअर्थी, कल्याण येथील रेल्वे लाईनवरील जुना पत्री पुल सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद असल्याने नविन पत्रीपुलावरून वाहतुक सुरू आहे. जुन्या रेल्वे पत्री पुल तोडने बाबत मा.डेप्युटि चिफ इंजिनिअर पनवेल यांनी दि. १६/११/२०१८ ते दि.१९/११/२०१८ पर्यंत जुन्या रेल्वे पत्री पुलाचे निष्काशन करण्यात येणार आहे असे रेल्वे विभागाकडुन कळवीण्यात आले आहे.

सदर जुना रेल्वे पत्री पुल तोडण्याचे काम सुरू असतांना डोंबिवली शहरातुन म्हसोबा चौक मार्गे वाहतुक शाखा, डोंबिवली शहरातून ९० फुट रोडने कचोरे गाव मार्गे नवीन पत्रीपुल कडे जोडणारा रस्ता सुरु राहिल्यास सदर कामात अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच पत्रीपुल पाडण्यासाठी जी यंत्रसामुग्री व क्रेन इत्यादी सामान त्यांची जुळवणी करण्यासाठी व कामा मध्ये अडथळा निर्माण होवू नये व कोणताही अपघात होवुन कोणालाही इजा पोहचु नये यासाठी सदर ९०फुट रोडने पत्रीपुलाकडे येणारी वाहतुक पुर्णपणे बंद करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत वाहतुक सुरळीत व सुरक्षित राहावी, वाहतुकीची कोंडी होवु नये याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

त्याअर्थी मी अविनाश मोहीते, ठाणे पोलीस आयुक्तालयाचे वाहतुक विभागाचे प्रभारी पोलीस उप आयुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७.०९.१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

१) डोंबीवली शहरातून ९० फुट रोडने कचोरे गाव मार्गे नवीन पत्रीपुल कडे जाणा–या. तसेच पत्रीपुलाकडुन डोंबिवली शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कचोरे गाव रोड येथे **'प्रवेश बंदी'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:– सदरची वाहने म्हसोबा चौक येथून उजवीकडील ९० फुट रोडने वळवून खंबालपाडा–टाटा रोड मार्गे– मानपाडा रोड ने इच्छितस्थळी जातील.**

Scanned by CamScanner

सदर अधिसचना दिनांक १६/११/२०१८ रोजी १८.०० वा. पासुन दिनांक १९/११/२०१८ रोजी ०६.०० वा. पोवेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही जुना रेल्वे पत्रीपुल निष्काशनातील कामाची वाहने,पोलीस,फायरब्रिगेड,रूग्नवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

(अविनाश मोहीते)
प्रभारी पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सदर :–**

१) मा.पोलीस आयुक्त , ठाणे शहर .
२) मा.पोलीस सह आयुक्त , ठाणे शहर.
३) मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
४) मा.जिल्हाधिकारी, ठाणे.
५) मा.आयुक्त कल्याण–डोंबिवली महानगरपालीका.
६) मा.पोलीस उप आयुक्त परि.३ कल्याण/विषेश शाखा ठाणे
७) मा.विभाग नियंत्रक राज्यपरिवहन विभाग ठाणे,भिवंडी,कल्याण
८) मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी,कल्याण.
९) नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण.

प्रत–मा.पोलीस उप आयुक्त,आथिक गुन्हे शाखा,ठाणे शहर .

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती

समन्वय अधिकारी,९ एएस कक्ष,ठाणे .

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीस प्रसिध्दीसाठी.

प्रत–सपोआ/वाहतुक विभाग कल्याण व प्रभारी अधिकारी डोंबिवली ,कल्याण, कोळशेवाडी

प्रत– उप अभियंता मध्य रेल्वे पनवेल.

अधिसुचनेच्या अंमलबजावणीसाठी सुयोग्य दिशा दर्शक फलकांची रेल्वे विभागाच्या संबंधीत अधिका–यांकडुन पुर्तता करून घ्यावी.

Scanned by CamScanner